# वसई-विरार शहर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय विरार

दि.१३/०७/२०२४

**<u>वसई विरार शहर महानगरपालिकेमार्फत "मुख्यमंत्री – माझी लाडकी बहीण" योजनेच्या अंमलबजावणीकरिता प्रभाग समितीनिहाय एकूण ११५ मदत कक्ष कार्यान्वित</u>**

राज्यातील महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी, त्यांच्या आरोग्य आणि पोषणामध्ये सुधारणा करणे आणि कुटुंबातील त्यांची निर्णायक भूमिका मजबूत करण्यासाठी महाराष्ट्र राज्याची "मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण" योजना महाराष्ट्र शासनामार्फत सुरु करण्यात आली आहे.

या योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने महानगरपालिकेच्या ९ प्रभाग समित्यांमध्ये वॉर्डनिहाय ११५ मदत कक्ष स्थापन करण्यात आले असून लाभार्थ्यांना मदत कक्षांमध्ये जाऊन विनामुल्य अर्ज करता येतील. सदर मदत कक्षांची यादी महानगरपालिकेच्या ९ प्रभाग समिती कार्यालयांमध्ये त्याचप्रमाणे महानगरपालिकेच्या vvcmc.in या अधिकृत संकेतस्थळावर तसेच महानगरपालिकेच्या फेसबुक, ट्विटर, व्हॉट्सअॅप या सोशल मिडियावरही प्रसिद्ध करण्यात आली आहे .

❖ **<u>योजनेचे स्वरूप :-</u>**

प्रत्येक पात्र महिलेला तिच्या स्वत:च्या आधार लिंक केलेल्या सक्षम बँक खात्यात थेट लाभ हस्तांतरण द्वारे (Direct Benefit Transfer) दरमहा रु.१५००/- इतकी रक्कम दिली जाईल.

❖ **<u>योजनेचे लाभार्थी :-</u>**

महाराष्ट्र राज्यातील २१ ते ६५ य वर्ष वयोगटातील विवाहित, विधवा, घटस्फोटीत, परित्यक्त्या आणि निराधार महिला तसेच त्या कुटुंबातील केवळ एक अविवाहित महिला.

❖ **<u>पात्रता :-</u>**

१) महाराष्ट्र राज्याचे रहिवाशी असणे आवश्यक.
२) राज्यातील विवाहित, विधवा, घटस्फोटीत, परित्यक्त्या आणि निराधार महिला तसेच त्या कुटुंबातील केवळ एक अविवाहित महिला.
३) किमान वयाची २१ वर्षे पूर्ण व कमाल वयाची ६५ वर्षे पूर्ण होईपर्यंत.
४) लाभार्थ्यांचे स्वत:चे आधार लिंक असलेले बँक खाते असणे आवश्यक.
५) लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु.२.५० लाखापेक्षा जास्त नसावे.

❖ **<u>आवश्यक कागदपत्रे :-</u>**

१) आधार कार्ड (अर्जामध्ये आधारकार्ड वरील नाव नमूद करावे)
२) अधिवास प्रमाणपत्र/ जन्म प्रमाणपत्र / शाळा सोडल्याचा दाखला (अधिवास प्रमाणपत्र उपलब्ध नसेल तर महिलेचे १५ वर्षापूर्वीचे रेशनकार्ड / मतदार ओळखपत्र / जन्म प्रमाणपत्र / शाळा सोडल्याचा दाखला
३) महिलेचा जन्म परराज्यातील असल्यास पतीचा जन्म दाखला / शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र / अधिवास प्रमाणपत्र
४) उत्पन्न प्रमाणपत्र (रु.२.५० लाखापर्यंत) / पिवळे/केशरी रेशनकार्ड
५) अर्जदाराचे हमीपत्र
६) बँक पासबुक (आधार लिंक असलेले)
७) अर्जदाराचा फोटो (स्वत: लाभार्थी महिला उपस्थित असणे आवश्यक)

❖ **<u>अर्ज करण्याची पद्धत :-</u>**

योजनेचे अर्ज पोर्टल /मोबाईल अॅपद्वारे / सेतु सुविधा केंद्राद्वारे ऑनलाइन भरले जाऊ शकतात.

❖ **अर्ज करण्याची प्रक्रिया :-**

१) पात्र महिलेस ऑनलाइन नारीशक्ती दूत ॲपद्वारे अर्ज करता येईल. नारीशक्ती दूत ॲपद्वारे अर्ज करण्यासाठी खालील लिंकवर क्लिक करावे.
https:play.google.com/store/apps/details?id=com.saaviinfinet.narishakti_yojana_doot

२) ज्या महिलेस ऑनलाइन अर्ज करता येत नसेल, त्यासाठी अर्ज भरण्याची सुविधा महानगरपालिकेचे मदत कक्ष, अंगणवाडी केंद्रात / बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालये (नागरी/ग्रामीण/आदिवासी) / ग्रामपंचायत/ वॉर्ड / सेतु सुविधा केंद्र येथे उपलब्ध असेल. या अर्जासाठी कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारले जाणार नाही.

३) वरील भरलेला फॉर्म महानगरपालिका मदत कक्ष, अंगणवाडी केंद्रात / बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालये (नागरी/ग्रामीण/आदिवासी) / ग्रामपंचायत/ वॉर्ड / सेतु सुविधा केंद्र येथे ऑनलाइन प्रविष्ट केला जाईल व प्रत्येक अर्जासाठी यथायोग्य पोच पावती दिली जाईल.

❖ **अर्ज कुठे दाखल करू शकता ? :-**

१) पात्र महिला स्वत: ऑनलाइन नारीशक्ती दूत ॲपद्वारे अर्ज करू शकते.

२) वसई विरार शहर महानगरपालिकेच्या ९ प्रभाग समिती कार्यालयांसह वॉर्ड निहाय ११५ मदत कक्षांमध्ये जाऊन अर्ज करता येतील. मदत कक्षांची यादी महानगरपालिकेच्या vvcmc.in या अधिकृत संकेतस्थळावर तसेच महानगरपालिकेच्या फेसबुक, ट्विटर, व्हॉट्सॲप या सोशल मिडियावरही यादी उपलब्ध आहे.

३) महानगरपालिका क्षेत्रातील अंगणवाड्यांमध्ये अर्ज करता येईल. एकूण ४१३ अंगणवाड्यांची यादी महानगरपालिकेच्या vvcmc.in या अधिकृत संकेतस्थळावर तसेच महानगरपालिकेच्या फेसबुक, ट्विटर, व्हॉट्सॲप या सोशल मिडियावरही यादी उपलब्ध आहे.

४) महाराष्ट्र शासनाच्या आपले सरकार केंद्रांमध्येही अर्ज दाखल करता येतील.

❖ **दि.१२ जुलै २०२४ च्या शासन निर्णयाद्वारे अंमलबजावणीप्रक्रियेत अधिक सुलभ तरतुदी :-**

१) कुटुंबाची व्याख्या – पती, पत्नी व त्यांची अविवाहित मुले / मुली.

२) नवविवाहित महिलेच्या बाबतीत तिचे नाव रेशनकार्डवर लगेच लावणे शक्य होत नाही. त्यामुळे विवाह नोंदणी प्रमाणपत्र असलेल्या नवविवाहित महिलेच्या पतीचे रेशनकार्ड हे उत्पन्नाचा दाखला म्हणून ग्राह्य धरण्यात यावे.

३) परराज्यात जन्म झालेल्या व महाराष्ट्रात सध्या वास्तव्यास असेल त्या महिलेने महाराष्ट्रातील अधिवास असणाऱ्या पुरुषाबरोबर विवाह केला असेल अशा बाबतीत त्या महिलेच्या पतीचा जन्मदाखला किंवा शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र किंवा अधिवास प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येते. याशिवाय महिलेच्या पतीचे १५ वर्षापूर्वीचे रेशनकार्ड व १५ वर्षापूर्वीचे मतदान कार्ड देखील ग्राह्य धरण्यात यावे.

४) सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी पोस्टातील बँक खातेही ग्राह्य धरण्यात यावे.

५) योजनेच्या ऑफलाइन अर्जावरील लाभार्थी महिलेच्या फोटोचा फोटो काढून तो ऑनलाइन अर्ज दाखल करण्यासाठी ग्राह्य धरण्यात यावे.

तरी योजनेस पात्र लाभार्थी महिलांनी नारीशक्ती दूत ॲपद्वारे स्वत: अर्ज करावा अथवा महानगरपालिकेने सुरु केलेल्या आपल्या नजीकच्या मदत कक्षांना, अंगणवाडी केंद्रांना व अर्ज भरण्याची सुविधा असलेल्या वरील नमूद ठिकाणांना भेट देऊन योजनेचा अर्ज दाखल करावा आणि शासनाने जाहीर केलेल्या "मुख्यमंत्री – माझी लाडकी बहीण" योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन मा.आयुक्त श्री.अनिलकुमार पवार यांच्या वतीने करण्यात येत आहे.

**मुख्य कार्यालय विरार**
**वसई विरार शहर महानगरपालिका**